# NIRMAN

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TITEN

**CLUB E- BULLETIN -ROTARY CLUB OF BADLAPUR INDUSTRIAL AREA**

**MONTHLY ISSUE - AUGUST 25**

**Dist.: 3142 • Club Id: 53964**

## Installation Ceremony 15th June 2025

### Rotary Members



RTN. AMIT PADHYE
CLUB PRESIDENT
2025-2026

RTN. SANTOSH BANE
CLUB SECRETARY
2025-2026

RTN. SATISH SALVANKAR
BULLETIN EDITOR
2025-2026



I AM A PROUD MEMBER

MEMBERSHIP AND NEW CLUB DEVELOPMENT MONTH

| Sr. No | Content | Pg. No |
|---|---|---|
| 1 | Membership Month | 3 |
| 2 | Installation Ceremony Showcase | 4 |
| 3 | Monthly Project Brief by TiTEN President - Rtn. Amit Padhye’s | 5 |
| 4 | Manogat by Rtn. Dr. Savita Jawadekar | 6 |
| 5 | Interact Club Installation Ceremony | 7 |
| 6 | Blood Donation Camp - 1st July 2025 | 9 |
| 7 | Career Guidance Project and Basic Electronics Workshop | 10 |
| 8 | Ideal Study App Distribution | 12 |
| 9 | Senior Citizen Health Camp | 13 |
| 10 | Tree Plantation | 14 |
| 11 | Monsoon Picnic | 15 |
| 12 | Free Cataract Eye Checkup and Surgery | 17 |
| 13 | Ganpati Idol Workshop | 19 |
| 14 | TRF Contributions | 22 |

# AUGUST
# is Membership Month !!

अगस्त को रोटरी में सदस्यता और नए क्लब विकास माह के रूप में मान्यता प्राप्त है! आइए हम अपने समुदाय के विस्तार पर ध्यान केंद्रित करें और सेवा के प्रति हमारे समर्पण को साझा करने वाले नए सदस्यों का गर्मजोशी से स्वागत करें। एक साथ काम करके, हम अधिक प्रभाव प्राप्त कर सकते हैं और वैश्विक स्तर पर सकारात्मक परिवर्तन को प्रभावित कर सकते हैं।

August is recognized as Membership and New Club Development Month in Rotary! Let us concentrate on expanding our community and warmly welcoming new members who share our dedication to service. By working together, we can achieve a greater impact and effect positive change globally.

PDG Ramesh Aggarwal,
District Membership Chair, D-3012






# ROTARY CLUB OF BADLAPUR INDUSTRIAL AREA
# 26th Installation Ceremony Showcase



















# Rotary July 2025 चा आढावा...

रोटरी नमस्कार !

ऑगस्ट महिन्याचा अंक वाचकांसाठी उपलब्ध करून देताना अतिशय आनंद होत आहे. रोटरी क्लबच्या २६ व्या अध्यक्षपदाची धुरा घेतल्यानंतर समाज उपयोगी कामांची सुरवात करतांना एक वेगळाच आनंद होत आहे.

१५ जुन २०२५ रोजी क्लब अध्यक्ष पदाची धुरा हाती घेतली. १ जुलै रोजी रक्तदान शिबीर आयोजीत केले. त्यादिवशी ७० रक्तदात्यांनी रक्तदान करून एक वेगळाच विक्रम आपण यावर्षी केला.

जुलै महिन्यात १००० Ideal Study App चे वाटप आपल्याकडून १० वीच्या विद्यार्थ्यांनाबदलापूर व रत्नागिरी या ठिकाणी करण्यात आले. १० वी नंतरच्या करियर वाटा यांविषयीचे मार्गदर्शन रो. विलास वखारे यांनी जवळ-जवळ १० शाळांमध्ये केले.

रोटरी क्लब ऑफ बदलापूर इंडस्ट्रियल एरिया मार्फत दर महिन्याला राबवण्यात येणाऱ्या मोतीबिंदु तपासणी शिबिर महागणपती मंदिर बदलापूर गांव येथे, भक्ती वेदांत हॉस्पीटल यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले. यात १४ मोतीबिंदु शस्त्रक्रियेचा लाभ घेतला गेला.

Interact club St Anthony High School चे Installation करण्यात आले.

ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबीर घेतले गेले. त्यात ६४ नागरिकांची तपासणी करून औषधे ही देण्यात आली. तसेच २१ पेक्षा जास्त लोकांना ECG काढून दिले.

वृक्षारोपण कार्यक्रमा अंतर्गत १०० विविध प्रकारचे वृक्ष सर्वसदस्यांच्या मदतीने लावण्यात आले.

या महिन्यात रोटरीच्या विविध अंगी कार्यक्रमांचे आयोजन करताना खरोखर एक अध्यक्ष या नात्याने रोटरी परिवारातील सदस्यांसोबत अनेकानेक माध्यमातून कार्य होत आहे. या सारखे समाधान नाही.



BY. TITEN RCBIA PRESIDENT
RTN. AMIT PADHYE



# मनोगत

BY RTN. DR. SAVITA JAWADEKAR

२०१६-१७ मध्ये आपला ठाणे जिल्हा, नवी मुंबई, भिवंडी मिळून वेगळा प्रांत तयार झाला. मुळचा मुंबई प्रांत क्रमांक ३१४० चे मुंबई ३१४१ आणि आपला ३१४२ असे दोन वेगळे प्रांत तयार झाले. या वर्षाला Numero Uno म्हणजे 'पहिला नंबर' असं म्हणायचं ठरलं आणि या नवीन प्रांताची आपल्या क्लबची अध्यक्ष होण्याची संधी मला मिळाली !

नवीन असल्यामुळे उत्साह खूप होता. काहीतरी वेगळं, नवीन करायचं म्हणून अध्यक्ष होण्यापूर्वीच आपण आपलं राष्ट्रगीत स्टुडियोमध्ये रेकॉर्ड केलं ( आम्ही चार कुटुंबियांनी नियमानुसार बरोबर ५२ सेकंदात रेकॉर्ड केलं) आणि सगळ्या रोटरी परिवाराने त्याच्या चित्रीकरणात उत्साहाने सहभाग घेतला ! तसंच डॉ. योगेंद्र ने लिहिलेलं आणि स्वरबध्द केलेलं Rotary Theme Song of 4 Way Test आमच्या मुलीच्या - आरोही च्या आवाजात रेकॉर्ड केलं, जे आजही आपण प्रत्येक मोठ्या कार्यक्रमात वाजवतो.

आमचे प्रांतपाल डॉ. चंदू कोलवेकर यांनी काही प्रकल्प आखून दिले होते.. त्याप्रमाणे १ जुलै पूर्वीच रेल्वे स्टेशन स्वच्छता आणि सौंदर्यीकरण हा प्रकल्प सगळ्यांनी मिळून पूर्ण केला... सर्व स्टेशन रंगीबेरंगी चित्रांनी सजलं होतं ! पहिल्याच दिवशी रक्तदान शिबिर आणि हा प्रकल्प पाहायला येऊन आपल्याला जिल्ह्यातील अधिका- यांनी खूप नावाजलं.. मुख्य म्हणजे आपल्या परिवारातील सगळ्यांचे स्नेहबंध अधिक घट्ट झाले !

निरनिराळ्या ग्रामीण शाळांसाठी जास्तीत जास्त प्रकल्प करायचं आपण ठरवलं. त्यानुसार ५ शाळांना प्रत्येकी ३५००० रु.ची E Learning Kits दिली, २ शाळांना Happy Schools बनवलं - त्या शाळांना रंगकाम साहित्य, नवीन बाक, फळे, प्रयोगशाळा उपकरणे दिली. नाईक विद्यालयात पूर्ण दिवसाचं समुपदेशन शिबिर घेतलं तसंच ' नवदुर्गा ' नावाने नवरात्रीत मुलींकरता स्वसंरक्षण शिबिर घेतलं जे आपण तेव्हापासून दर वर्षी करतो.

कान्होरच्या शाळेला ५ लाख रुपयांचं पत्र्याचं छप्पर बांधून दिलं. लवाळीच्या आश्रमशाळेत सौर उर्जेवर चालणारे पाणी तापक ऑस्ट्रेलियातील एका रोटरी क्लबच्या मदतीने दिले आणि सौर दिवे district grant मधून दिले. कुबनप शाळा क्रमांक ३ इथे विज्ञान प्रयोग दाखवले आणि हिराजी गोमाजी शाळेला सूक्ष्मदर्शक यंत्र दिलं. पिंपळोलीच्या शाळेला खेळ साहित्य आणि वाद्ये दिली तर जुवेलीच्या शाळेच्या ५० मुलांनी आयुष्यात पहिल्यांदाच सहलीचा आनंद घेतला! तसंच गांधी चौक इथल्या मराठी शाळेला district grant मधून स्वच्छतागृह बांधून दिलं.

# मनोगत

डायबेटिस नियंत्रण हा उपक्रम आम्हांला जिल्ह्याने ठरवून दिला होता. त्यामुळे ' बदलापूर मधुमेही संघटना ' स्थापन केली व तज्ज्ञ डॉक्टरांची व्याख्याने, रक्तशर्करा तपासणी, डोळ्यांची रेटायना तपासणी, मधुमेहींकरता पाककृती स्पर्धा असे अनेक उपक्रम केले. आपले चुरी अण्णा या संघटनेचे अध्यक्ष होते. ही संघटना आपली सहयोगी म्हणजे Rotary Community Corps ( RCC ) होती.

महिला सक्षमीकरणासाठी आपल्या आदर्श शाळेतील व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात ४० महिलांना मोफत ' बेसिक ब्युटी पार्लर प्रशिक्षण 'दिलं. तसंच महिला दिनानिमित्त 'कॅन्सरशी लढा ' यावर व्याख्यान झालं तसंच कॅन्सरवर मात केलेल्या आणि लष्करात कार्यरत असणा-या जवानांच्या पत्नी यांचा सत्कार केला. २५ आदिवासी महिलांसाठी साक्षरता शिबिर घेतलं. त्याशिवाय आपल्या क्लबच्या प्रत्येक मोठ्या कार्यक्रमात महिला उद्योजिकांना माफक दरात स्टॉल्स लावायला दिले जेणेकरून त्यांच्या विक्रीला प्रोत्साहन मिळेल.

तरुण वर्गासाठी ३ दिवसांचा Rotary Youth Festival ' आयोजित केला पहिल्या दिवशी सेमिक्लासिकल नृत्य स्पर्धा, दुस- या दिवशी आंतर महाविद्यालयीन पथनाट्य स्पर्धा आणि तिस-या दिवशी लघुपट स्पर्धा असा भरगच्च कार्यक्रम होता ज्याला चांगला प्रतिसाद मिळाला. शास्त्रीय नृत्याला प्रोत्साहन म्हणून Rotary Dance Festival आंतरराष्ट्रीय नृत्य दिनानिमित्त बदलापूर मध्ये विविध नृत्य वर्गांच्या साथीने सुरू केला जो आजही चालू आहे. याशिवाय आपल्या family nights मध्येही विविधता आणण्यासाठी V. Shantaram night', Fashion show असे वेगळे प्रयोग केले. आपले गणपती करणे, मंगळागौर, वृक्षारोपण, पावसाळी सहल हे नेहमीचे उपक्रम चालूच होते. निधी संकलनाकरता ठाण्याच्या काशीनाथ घाणेकर नाट्यगृहामध्ये आमच्याच गाण्यांचा कार्यक्रम केला, त्यातून प्रथमच सर्व खर्च वजा जाता ४ लाख रुपये इतका निधी गोळा झाला ! आपल्या सर्व avenues मध्ये काम केल्या मुळे आणि त्यांचा गोषवारा वेळोवेळी जिल्ह्याला पाठवल्यामुळे, तसंच वर्तमानपत्रांतून त्याला प्रसिद्धी दिल्यामुळे जिल्ह्यात आपल्या क्लबचं नाव प्रत्येकाच्या तोंडी झालं आणि Best Club in Dist 3142 अशी भली मोठी ट्रॉफी आपल्या क्लबला पहिल्यांदाच मिळाली ! माझा सहकारी क्लब सचिव वैभव लवाटे, माझे कुटुंबीय आणि क्लबचे सर्व सदस्य आणि Anns यांच्या सहकार्यामुळेच हे शिवधनुष्य पेलता आले... या सर्वांची मी शतशः ऋणी आहे !!!

Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# St. Anthony Interact Club Installation Ceremony Showcase
















BY RTN.RAJIV DIWAN

# रक्षाबंधन



सोने कि न चांदी कि
राखी चाहिये मुझे
रेशमका एक धागा
बांध देना कलाई पर
खुश हो जाऊंगा मै

लेकिन दिदी मत खरीद चीनी राखी
तेरा एक भाई खडा है सरहदपर
जिसके सिनेपे रखी है चिनी संगीन
मालूम नहीं पंधरह आगस्त को
तिरंगा लेहेराएगा या
वो ही तिरंगेमे लपेटके आएगा.

अगर है तू भारतमॉ कि बेटी
रखनी है तूझे तिरंगे कि शान
अपने फौजी भाईयों का सन्मान
तेरी रेशमी राखी लाएगी कलाईमें जान...

भारतवर्ष कि सभी बेहेनोको सादर प्रणाम!!!!

© राजीव दिवाण

( हिन्दी इसीलिए कि, भारतवर्ष की सभी बेहने पढ सके..)

# BLOOD DONATION CAMP
# 1ST JULY 2025









Today 1st of July a beginning of Titen year was started with Blood Donation camp at Adarsha College . With immense pleasure it feels great to announce that a number of 70 bags of blood were collected.

BENEFICIARIES : 210 MAN HOURS : 96 MEMBERS : 35

# DOCTOR'S DAY CELEBRATION
# 1ST JULY 2025







# Career Guidance Project and Basic Electronics Workshop









Dates:

- 3 July - Shri Ganesh Prabodhini , Madhyamik Vidyalaya
- 5 July - Badlapur Highschool
- 11 July - Hiraji Gomaji Highschool
- 12 July - Bhagini Mandal Vidyalaya
- 13 July - St. Anthony Higher Secorndary School
- 17 July - D-Tech Academy
- 19 July - Navi Mumbai Mulcipal Corporation School No. 108
- 29 July - Kamaljabai Mulye High School, Ratnagiri
- Khedshi, Mahalakshmi Mahavidyalaya





In July 2025, Rotary Club of Badlapur Industrial Area guided students from 9 schools in Badlapur, Ambernath, and Ratnagiri on career choices after 10th/12th. Hands-on electronics workshops were also conducted to spark interest and provide practical exposure in the field.

BENEFICIARIES : 1.3 Lakh MAN HOURS : 670 MEMBERS : 27



# Woollen Earrings

BY. ANN ROHINI PARASKAR













# Ideal Study App Distribution











Dates:

17 July -

- Kahanor Schoool
- Badlapur High School
- Adarsh English Medium School
- Dwarkabai Balvikas School
- Hiraji Gomaji School
- Samarth Vidyalaya

23 July -

- Adarsh VidyaMandir

28 July -

- Mahatma Gandhi Madhyamik Vidyalaya, Ratnagiri
- New English School, Nivli

29 July -

- Kamaljabai Mulye High School, Ratnagiri
- Khedshi, Mahalakshmi Mahavidyalaya

31 July

- New Pmploli High School
- Z.P. High School Mulgaon

In July, the Rotary Club of Badlapur Industrial Area successfully distributed the Ideal Study App to students across 13 schools in Badlapur, Ambernath, and Ratnagiri. This powerful digital tool is set to enhance academic performance and support students in achieving higher scores as they progress in their education.

BENEFICIARIES : 4.27 Lakh MAN HOURS : 405 MEMBERS : 14

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TITEN

# Senior Citizen Health Checkup Camp

## 13TH JULY 2025















In July, the Rotary Club of Badlapur Industrial Area organized a dedicated health check-up camp for senior citizens in Badlapur, benefiting 77 elders. This initiative reflected our deep commitment to the health, dignity, and well-being of the senior members of our community.

BENEFICIARIES : 77 MAN HOURS : 100 MEMBERS : 20

# Tree Plantation
## 20TH JULY 2023








As part of our commitment to a greener tomorrow, the Rotary Club of Badlapur Industrial Area planted 60 trees in Badlapur during the month of July. This initiative not only contributes to environmental sustainability but also reinforces our dedication to community well-being and ecological balance.

BENEFICIARIES : 60 MAN HOURS : 96 MEMBERS : 24

# Monsoon Picnic
# 20TH JULY 2023












# Be Creative



BY RTN. SHALAKA MANGEKAR






BY

VAISHNAVI DHIRENDRA PRATAP SINGH

CLASS- 6TH/B

MEMBER OF INTERECT CLUB







MATSYA AVTAR

BY
ANNET AVANI PADHYE

BY
ANNET SAAVI S



# Free Cataract Eye Checkup and Operation
# 22TH JULY 2023












In July, the Rotary Club of Badlapur Industrial Area conducted a free cataract screening and surgery drive, bringing the gift of clear vision to 74 citizens. This impactful initiative highlighted our ongoing mission to restore health and hope through compassionate service.

BENEFICIARIES : 74 MAN HOURS : 55 MEMBERS : 11



ANN. सौ. उन्नती वखारे

# वाचलेलं छानसं!

'इकिगाई'

दीर्घायुषी, निरोगी, आनंदी जीवनाचे जपानी रहस्य! इकिगाई ही जपानी संकल्पना आहे. याचा ढोबळ मानाने अर्थ आहे 'सतत व्यस्त राहण्यात असलेला आनंद.' सकस अन्न, ग्रीन टी, चांगलं हवामान, साधी रहाणी आणि इकिगाई ही जपानी लोकांच्या दीर्घायुष्याची कारणे आहेत. जपानी संस्कृती मध्ये निवृत्त होण्याची संकल्पनाच नाहीये. ओकिनावा सारख्या भागात जवळजवळ 25% लोकसंख्या शतायुषी आहे. जपानी लोकांमध्ये कॅन्सर, हृदयरोग, स्मृतिभंषासारखे आजार जगाच्या तुलनेत नगण्य असतात. 'इकिगाई' म्हणजे अर्थपूर्ण जगणे. त्यांच्या दीर्घायुष्याचे रहस्य खाद्यसंस्कृती, व्यायाम, जीवनाचा इकिगाई जाणणं आणि मित्रपरिवारामध्ये चांगले नातेसंबंध असणं हे आहे.

जपानी लोकांच्या आनंदी जीवनशैलीचे रहस्य म्हणजे त्यांची सामाजिक बांधिलकी. मित्रत्वाची भावना जपणं, हलका आहार, पुरेसा आराम आणि नियमित व्यायाम या बरोबरच 'इकिगाई' हे त्यांच्या शतकी जीवनाच्या मागील खरे कारण आहे. क्षणभंगूर, सतत बदलण्याऱ्या निसर्गातील सौंदर्य शोधायची कला 'वाबी-साबी' ही जपानी संकल्पना आपल्याला सांगते. त्याचप्रमाणे 'ईचीगोइचीइ' म्हणजेच 'आत्ताचा वर्तमानातील क्षणच खरा आहे आणि तो परत येणार नाही' या वाक्याची मित्रांना भेटल्यावर, नातेवाईकांकडे गेल्यावर, समारंभामध्ये कायम एकमेकांना आठवण करून दिली जाते.

इकिगाईचे 10 नियम.

1. कायम कार्यरत रहा, कधीही निवृत्त होऊ नका.
2. निवांत रहा.
3. तुमचं पोट 80% भरेपर्यंतच जेवा.
4. चांगला मित्रपरिवार.
5. पुढच्या वाढदिवसाला जास्त तंदुरुस्त व्हा.
6. हसत रहा.
7. निसर्गाशी जोडले जा.
8. धन्यवाद द्या.
9. वर्तमानामध्ये जगा.
10. तुमच्या इकिगाई प्रमाणे वागा.
11. तुम्हाला दीर्घायुषी, आनंदी आणि उद्देश्यपूर्ण जीवन लाभो हीच सदिच्छा!

( The Japanese secret to a long, happy life by Hector Garcia, Francesc Miracles in Marathi या पुस्तकातून संकलित.)

# Ganpati Idol Workshop
# 26TH & 27th JULY 2023








In July, the Rotary Club of Badlapur Industrial Area successfully organized a Shaadu Ganesh Murti making project, promoting eco-friendly celebrations and cultural values. A total of 19 beautifully handcrafted idols were created, inspiring sustainable practices rooted in tradition.

BENEFICIARIES : 19 MAN HOURS : 204 MEMBERS : 17

# The history of "Rotary Ann's".

In many Rotary clubs throughout the world, wives of male members are affectionately called "Rotary Ann's." This designation was never one of disparagement, but rather grew out of an interesting historical occasion. The year was 1914 when San Francisco Rotarians boarded a special train to attend the Rotary Convention being held in Houston. In those days few wives attended Rotary events, and until the train stopped in Los Angeles, the only woman aboard was the wife of Rotarian Bru Brunnier. As the train picked up additional convention-bound delegates, Mrs. Ann Brunnier was introduced as the Rotarian's Ann. This title soon became "Rotary Ann." Since the clubs of the West were inviting the Rotarians to hold their next convention in San Francisco, a number of songs and stunts were organized that would be performed in Houston. One of the Rotarians wrote a "Rotary Ann" chant. On the train's arrival at the Houston depot, a delegation greeted the West Coast Rotarians. One of the greeters was Guy Gundaker of Philadelphia, whose wife was also named Ann. During the rousing demonstration, someone started the Rotary Ann chant. The two petite ladies, Ann Brunnier and Ann Gundaker, were hoisted to the men's shoulders and paraded about the hall. The group loved the title given to the two women named Ann. Immediately the same term of endearment was used for all of the wives in attendance, and the name "Rotary Ann" was here to stay.

Guy Gundaker became president of Rotary International in 1923 and Bru Brunnier was elected president in 1952. Thus, each of the two original Rotary Ann's became the "first lady of Rotary International."



BY RTN. NITIN CHONKAR

# WEEKLY MEETINGS
# EVERY WEDNESDAY @ 8.30 P.M.

## WEEK 1 - CLUB ASSEMBLY




## WEEK 2 - REGULAR MEETING





## WEEK 3 - REGULAR MEETING




## WEEK 4 - Regular Meeting




Join the CELEBRATION!

# TRF Contributions



**KAPIL PADHER**
$1000



**JEEVAN PANCHAL**
$350



**NITIN CHONKAR**
$350



**PRIYA SHIRSAT**
$350



**PRASAD PALLIVAL**
$200



**VEENA PADHER**
$100



**SACHIN PHADNIS**
$100



**VIDYA RATHOD**
$100

# खाद्य यात्रा बदामी हम्पी ची

BY RTN. SHILPA JOGALEKAR

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हा आणि या भागाच्या खाद्य संस्कृती मध्ये बरेच साम्य आहे असं म्हणता येईल! अतिशय सुपीक आणि समृद्ध अश्या लाल आणि काळ्या माती शेतीसाठी उपलब्ध आहे, मलप्रभा, घटप्रभा या नद्यांच्या प्रवाहाने खोरं समृद्ध केलेले आहे. ज्वारी, मका, भुईमूग, ऊस, गहू, मिरच्या, कापूस, कांदे, याचे मोठ्या प्रमाणावर पीक घेतले जाते! दररोजच्या जेवणात ज्वारी ची भाकरी,शेंगदाण्याची चटणी, दही, एखादी पालेभाजी, भात आणि आमटी याचा समावेश होतो!

## लिंगायत खानावळी

याच्या माहिती शिवाय कर्नाटक ची खाद्य संस्कृती चे वर्णन अपुरे राहील !!! तर बसवेश्वर,/महाचित्रकूट लिंगायत खानावळी अशा पाट्या बघायला मिळतात, कट्टर हिंदू, प्रखर शिवभक्त, बसवेश्वर महाराजांवर श्रद्धा असणारा लिंगायत समाज अशा प्रकारच्या खानावळी चालवतात! शुद्ध शाकाहारी भोजनलयात कोणतेही fancy trendy, मेनू अजिबात नसतो!

पुढच्या भागात मिरची भज्जी( भज्जी असाच उच्चार करा आणि वाचा😃)चा घाणा तापत असतो, आणि ताज्या भाकरी /पोळ्या करणे चालू असते! बहुतांश पत्रावळी वापरल्या जातात. लाल पूड चटणी,कारळे किंवा काळे तिळाची कोरडी चटणी दह्याची छोटीशी वाटी ठेवून वाढायला सुरुवात केली जाते. तुम्ही कल्पना करणार नाही अशा निरनिराळ्या combination च्या भाज्या वाढल्या जातात (कमीत कमी 2),वाटीत आंबट , तिखट, गरमागरम असे सार वाढले जाते आणि मग येतात ज्वारीच्या मऊ , गरमागरम, पांढऱ्या ,तरी सुद्धा खरपूस भाजलेल्या, पापुद्रा सुटलेल्या भाकरी😊😊 आपल्याला पोळीची आठवण येत नाही, पोट भरतं पण मन नाही, डाव्या बाजूला काकडी( आपली नाही तर सुरकुत्या असलेली पण वेगळ्या चवीची , लांबडी अशी) मुळा, गाजर, मुळ्याची ताजी करकरीत पाने, मेथी ची पाने असे मिश्रण वाढले जाते, विशेष म्हणजे दाणे कूट, खोबरे,फोडणी दही असे काहीही नसले तरी हे स्लाड( हा तिकडच्या अण्णांनी केलेला उच्चार😊)झकास लागते!

# खाद्य यात्रा बदामी हम्पी ची

BY RTN. SHILPA JOGALEKAR

गरम भात आग्रहाने वाढला जातो, शेंगा पोळी मिळाली तर जरूर खावी, पुरीच्या आकाराची भरपूर सारण भरलेली( भाजलेले तीळ, शेंग दाणे, गूळ)खमंग भाजलेली आणि सढळ हाताने तूप सोडलेली पोळी जिव्हा तृप्त नक्की करते, सर्व भाज्या आग्रहाने आणि प्रेमाने वाढल्या जातात आणि त्या मानाने खिशावर फारसा ताण पडत नाही!!
मसाला कुरमुरी, मिरची भज्जी, चहा हे संध्याकाळचे खाणे आहे, जागोजागी उपलब्ध असतात, ताजे कुरमुरे कढीपत्त्याची चरचरीत फोडणी आणि लाल तिखट सढळ हाताने घालून ठेवलेले असतात, तुम्ही ते घरी नेऊ शकता किंवा तुम्हाला कच्चा कांदा ,तळलेली मिरची घालून तिथे बसून खायला देतात किंवा अजून एक प्रकार म्हणजे मसाला कुरमुरीवर भरपूर बारीक चिरलेली कांदा, कोथिंबीर ,थोडासा टोमॅटो घालतात, अगदी मनापासून कालवतात आणि गिरमिटु म्हणून सादर केले जाते, तिखट प्रेमी ना अजून एखादी तळलेली मिरची किंवा मिरची भज्जी तोंडी लावणे म्हणून खातात😊😊

## खाऊ पिऊच्या अधिक काही नोंदी

सकाळी इडली, मेदु वडा ,आलू बोंडे ( म्हणजे बटाटेवडा, पण दक्षिणी पद्धतीचा) डोसे, मिरची भज्जी, पुट्टू (म्हणजे आप्पे,माझं निरीक्षण अस की इडली , डोसे आणि पुट्टू च batter एकच असते) पुरी भाजी छोटेखानी टिफीन centre मध्ये उपलब्ध असतात! पुरी सोबत मिळणारी भाजी सौम्य चवीची ( काहींना तर बेचव , मुळमुळीत अशी सुद्धा वाटेल😃 )कमीत कमी तेलात केलेली मिश्र भाजी असते(दुधी , लाल भोपळा, फरसबी, गाजर, कांदा अशी) रस्सम भात भरपूर आवडीने जेवला जातो!
काही दुकानात सकाळी पुलाव मिळतो,अनेक जण आवडीने खातात सांबार आणि चटणी त्यावर घालून, !!

# FELLOWSHIP BIRTHDAY CELEBRATIONS OF THE MONTH




| | |
|---|---|
| 04th July | Rtn. Prasad Pallival |
| 19th July | Rtn. Amit Padhye |
| 19th July | Rtn. Manohar Kante |
| 21st July | Rtn. Kapil Padher |
| 28th July | Rtn Chetan Mahajan |
| 31st July | Rtn. Vinod Jade |











# मी आणि रोटरी ...

BY RTN. PRIYANKA DUDEJA






मी आणि रोटरी

(Ek Sevakan Yatra - Rotary Sobat)

"आपलं आयुष्य अर्थपूर्ण व्हावं, तर ते इतरांसाठी उपयुक्त हवं" - या विचारात माझ्या रोटरी प्रवासाची सुरुवात झाली.

मी एक सर्वसामान्य व्यक्ति, आयुष्यात शिक्षण, करीअर, कुटुंब या सर्व गोष्टी पार पाडताना नेहमीच मनात कुठेतरी एक ओढ होती - समाजासाठी काही करायचं, कुणासाठी तरी उपयुक्त ठरायचं, पण कुठून सुरुवात करावी हे कळत नव्हतं. तेव्हा माझ्या आयुष्यात रोटरीचे आगमन झाले, आणि त्या

1




समाजासाठी जगण्याच्या इच्छा शक्तीने समाधान देत गेली.

मला रोटरीने खूप काही दिले.

- नेतृत्व शिकवलं - माणसांना जोडायचं.
- सेवेचा खरा अर्थ सांगितला - न दिसणाऱ्या गोष्टींसाठी काम करणं.
- आत्मविश्वास दिला - लोकांसमोर बोलताना, काम करताना.
- मैत्री दिली - हृदयाशी जोडलेली.

रोटरीने मला 'मी' या शब्दाच्या बाहेर नेऊन "आपण" च्या विश्वात टाकलं.

2




मला कळालं कि, सेवा फक्त इच्छा असून होत नाही - ती शिस्त, समर्पण, नियोजन आणि संघभावना यानेच सिद्ध होते.

रोटरीमध्ये काम करताना मला, समाजातील अनेक अंधारलेल्या कोपऱ्यात पोहचता आले.

- लहान मुलांसाठी शिक्षण साहित्य वाटप.
- आरोग्य तपासणी शिबिरे
- वृक्षारोपण, पर्यावरण जागृती
- वृद्धाश्रम भेट, अन्नदान
- शाळांमध्ये डिजिटल लायब्ररीची (?) मदत.

प्रत्येक प्रकल्प, प्रत्येक मोहिम - मला

3



शिवाय मला माझं उद्दिष्ट, व्यासपीठ, आणि दिशा तिन्ही मिळाली.

रोटरी हि एक केवळ संस्था नाही, ती एक विचारधारा आहे - सेवा करण्याची आणि इतरांसाठी जगण्याची. रोटरी हि एक अशी जागा आहे जिथे वय, पद, व्यवसाय, धर्म, जात कोणतीही अडचण नसते. इथे सगळे समाजहितासाठी एकत्र येतात. हसत, खेळत काम करत आणि एकमेकांशी शिकत.

रोटरीमध्ये येताना मी एक सेवाभावी विचारांची व्यक्ति होते. पण इथे आल्यावर

4

# Anns Fun-Time...



The Rotary Anns gathered this month for a joyful get-together, hosted graciously at First Lady - Akshada Padhye's home. Laughter, camaraderie, and delightful moments made it a memorable afternoon, strengthening the bonds of friendship within our Rotary family.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >

लेह- लडाखची सफर हा खरं तर एक अप्रतिम अनुभव होता. या प्रवासात असंख्य गोष्टी शिकायला मिळाल्या. नव्याने उमजल्या , निसर्गसौंदर्याची खाण सापडली, कैक अनुभव आणि प्रत्येक वेळेस वेगवेगळ्या भावना ही सफर केल्यामुळे अनुभवली. अशा या रम्य सफरी बद्दलच्या भावना व्यक्त करणारा हा लेख.

सुरुवात झाली ती डॉ प्रियांका हिच्या BUCKET लिस्ट मधील या ड्रीम DESTINATION पासून. खर सांगायचं तर मला उंच उंच ठिकाणांचा FOBIAच म्हणा ना. त्यात लेह लडाख म्हणजे ऑक्सिजन ची कमतरता.
पण प्रियंकाला नाही म्हणू शकले नाही आणि जुन २०२५ ला जाण्याचे एप्रिल मधेच नक्की झाले. मे मध्ये काश्मीर मध्ये झालेल्या घटनेने या टूर ला पूर्णविराम लागले. सर्व मैत्रिणींच्या घरच्यांनी नकार दिला मनातून थोडा आनंद झाला पण प्रियांका साठी वाईट ही वाटले. पण म्हणतात न इच्छाशक्ती पुढे नियती ही काही करू शकत नाही आणि पूर्णविराम लागलेल्या या आमच्या टूर चा प्लॅन परत ऑन झाला जुलै साठी. आणि तारीख ठरवली १७ जुलै २०२५. पण तयार झालेल्या मैत्रिणींनी वेगवेगळ्या कारणाने नकार दिला. आणि दुर्ग मल्हार टूर्स ने सांगितले कमीतकमी ६ जण लागतील तर टूर लीडर ची सोय करता येईल. झालं आता परत शोधाशोध सुरू झाली. शलाका ने आधी ही टूर केली तरी आमच्या प्रेमापोटी परत एकदा येण्याची तयारी दाखवली आणि स्विटी, संगीता व विनया ही तयार झाल्या आणि अश्या प्रकारे आमचा ६ जणींचा ग्रुप तयार झाला व टूर COST EFFECTIVE करण्यासाठी आम्ही टूर कंपनी ला बाहेरील टुरिस्ट घेण्याची परवानगी दिली. व आम्ही रोटरी च्या ५ आणि बाहेरील ४ व एक टूर लीडर अशी १० जणांची टीम तयार झाली.

तोपर्यंत जून संपत आला. आणि वेध लागले १७ जुलैचे. नेहेमीप्रमाणे एक ऑनलाइन मीटिंग होऊन सर्वांची तोंडओळख झाली व दुर्ग मल्हारचे सर्वेसर्वा विवेक पाटील हे आमच्यासोबत येणार हे कळल्यावर होती ती भीतीही निघून गेली. त्यांनी पहिल्या मिटिंग मध्ये सर्व नियम व प्रवासाचा कार्यक्रम समजून सांगितला.

जसे जसे निघण्याचे दिवस जवळ येऊ लागले तसतसे सर्वांच्या सल्ल्यां मधे वाढ होऊ लागली [काळजी पोटी हं ]. पटापट सर्व मैत्रिणींनी काम हातावेगळी केली आणि आता फक्त बॅग भरून निघायचे एवढेच लक्ष्य ठेवले.

आणि दिवस उजाडला १७ जुलै २०२५ चा.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >



## पहिला दिवस १७ जुलै २०२५ - श्रीनगर

सकाळी ९.४० ला इंडिगो एयरलाईन ने विमान प्रवास मुंबई एअरपोर्ट ते श्रीनगर VIA चंदीगड असा होता. आणि मजा म्हणजे चंदीगड चा LAY OVER होता फक्त 1 तासाचा. नुसती पळापळ.

तर आम्ही सर्व सकाळी ७ वाजता मुंबई विमानतळावर भेटलो. यात प्रियंकाची मैत्रीण विनया, मालती काकू, प्रीती काकू आणि उदय काका यांच्याशी ओळख झाली. हे काका काकू म्हणजे साठी पार केलेले बरं का. म्हणजे या वयात लेह लडाख करण्याचा त्यांचा उत्साह हा माझ्या मनाला देखील स्फूर्ती देऊन गेला.

सर्व PROCEDURE झाल्यावर शलाकाने आणलेल्या इडली चटणी व मी नेलेल्या पराठ्यांवर सर्वांनी ताव मारला. दुपारी २.३० ला श्रीनगर ला सुखरूप पोहचलो. आपल्याकडे पाऊस तर श्रीनगरला थंड आणि आल्हाददायी वातावरण. काश्मीर च्या मध्यभागी असलेले श्रीनगर हे फारच लोकप्रिय शहर आहे. तसेच हाऊस बोट आणि तलाव यासाठी ही प्रसिध्द आहे. संध्याकाळी आम्ही दल नामक तलाव बघण्यासाठी व शिकाऱ्यामधे बसण्याचा आनंद घेण्यासाठी गेलो. शिकाऱ्यांमधे बसता क्षणी आजूबाजूच्या बोटी तील फळ वाले फुल वाले, खाद्यपदार्थ विक्रेते, काश्मिरी ड्रेस वाले यांचा घोळका आमच्या बोटी मागे लागला. बाकीच्यांना टुल्ली देत फक्त काश्मिरी ड्रेस मध्ये फोटो काढण्याची सुप्त इच्छा असल्याने ड्रेसवाल्यांशी संपर्क केला आणि भरपूर फोटो काढून घेतले. आणि राहिलेल्या वेळात आजूबाजूचे अप्रतिम निसर्ग सौदर्य अनुभवले.

नंतरचे पर्यटनस्थळ लाल चौक येथे गेलो. लाल चौकातील घड्याळ टॉवर १९८० मध्ये बांधण्यात आला. या चौक ला एक ऐतिहासिक व राजकीय इतिहास आहे जो तुम्हाला गूगल वर ही वाचायला मिळेल.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >



दुसरा दिवस १८ जुलै - कारगिल कडे प्रस्थान.!!

कारगिल....... आणखी एक अविस्मरणीय अनुभव

सकाळी गाडी आली आणि गणपती बाप्पा मोरया म्हणत आम्ही सगळे स्वार झालो. कारगिल कडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेने वाहणाऱ्या सिंधू नदीचे दर्शन घेतले. तिबेटमध्ये झालेल्या उगमापासून ते भारतातील लडाख पर्यंत आणि नंतर पाकिस्तानमधून ही नदी वाहते. सुंदर, स्वच्छ आणि नितळ आणि खळ खळणा-या पाण्याने मनात आपल्याकडील नद्या आणि लडाख मधील नद्यांची तुलना झाली आणि किंचित असूया वाटली.
पुढे द्रास येथील कारगिल वॉर म्युझियम ला भेट देण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग १ [NATIONAL HIGHWAY 1] हा भारताच्या जम्मू आणि काश्मीर व लडाख ह्या केंद्रशासित प्रदेशांमध्ये धावणाऱ्या राष्ट्रीय महामार्गा वरून प्रवास सुरु झाला. या महामार्गावरील २०१८ मध्ये सुरू केलेल्या १२ कि.मी. च्या सोनमर्ग बोगद्याचा लाभ घेता आला. याच महामार्ग १ ने झोजी ला पास [११६४९फूट] ला पोहचलो. या पास जवळ I LOVE BRO चे CUTOUT लावले होते. 'बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन' कडे सीमेवरील रस्त्यांची जबाबदारी आहे व ते आपले काम चोख करत आहेत, हे दिसत होतं. केवळ हाच रस्ता असं नाही, तर आम्ही लडाखमध्ये सर्व रस्त्यांवरून भरपूर प्रवास केला. त्या सर्व रस्त्यांची स्थिती चांगली, व्यवस्थित दिसली. नवीन रस्तेबांधणी चालू होती. व यात्रे करुंचे मांडे प्रकर्षाने दिसत होते. असे मजल दर मजल करत आम्ही द्रास ला पोहचलो.
तेथे पोहचल्यावर मराठा रेजिमेंट जवानांनी तत्परतेने सिक्युरिटी ची पूर्तता करत आम्हाला कारगिल युद्धावर १० मिनिटांची डॉक्युमेंटरी दाखविली. ते बघताना आम्हा सर्वांचे डोळे भरून येत होते.आपण किती सुरक्षित जगतो याचा प्रत्यय आला.
तेथील एक जवान कमांडर यांनी संपूर्ण म्युझियम दाखवत कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांनी केलेली कामगिरी कथन केली. त्यातील शहीद कॅप्टन मनोज पांडे यांचे शब्द ऐकताना आपले जवान या भारतमातेसाठी काय करू शकतात याचा प्रत्यय आला.

PANDEY'S FAMOUS QUOTE, "IF DEATH STRIKES BEFORE I PROVE MY BLOOD, I SWEAR I WILL KILL DEATH,"

यानंतर तेथील प्रमुख अधिकाऱ्यांची भेट घेत आपल्या सेंट ऐंन्थोनी स्कूल च्या इन्ट्रॅक्ट क्लब च्या विद्यार्थ्यांनी स्वतः बनविलेल्या राख्या [१०० +] येणाऱ्या रक्षाबंधन निम्मित जवानांना बांधण्याची परवानगी घेतली.
जवळपास २० जवानांना राख्या बांधत रक्षाबंधन चा सोहळा पार पडला. आपल्या ROTARIAN प्रतिभा मोरे ह्यांनी दिलेले लाडू त्यानी गोड म्हणुन स्वीकार देखील केले. आम्हा सर्वांचा आनंद गगनात मावत नव्हता.
अविस्मरणीय असा रक्षाबंधनाचा सोहळा पार पडला.हे क्षण मनात साठवत त्या दिवशी कारगिल मध्ये मुक्काम केला.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >




## तिसरा दिवस १९ जुलै २०२५- लेह कडे प्रस्थान...!!!

या दिवशी लेहकडे निघण्या आधी कारगिल येथील हुंडरमन व शिलकचे या भारत पाकिस्तान सीमेवरील गावांना भेट दिली. सीमा रेषेवरील VIEW पॉईंट वरून आपल्या सैन्याचे व पाकिस्तानी सैन्याचे बंकर, पाकिस्तानी गाव व मस्जिद दुर्बिणीतून दाखविण्यात आले.

तेथून निघून आम्ही लेह कडे प्रस्थान केले. या प्रवासात कारगिल लेह रस्त्यावरील मुलबेख या मठाला भेट दिली. आणि भव्य दगडात कोरलेल्या मैत्रेय बुद्धांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. पुढचा प्रवास हा नमीकाला पास [घाट] च्या दिशेने चालू झाला. नमीकाला पास १२१९८ फुटावर आहे. या घाटात फोटो काढत पहिला पडाव पार केल्याचे समाधान वाटले. पुढील पास हा फटूला पास होता जो साधारण १४४७८ फूट उंचीवर आहे. हा पास करून या रस्त्यावरील लामयुरू मठ, मून लँड्सकेप व श्री पत्थर साहिब गुरुद्वारा ला ही भेट दिली.

लेह ला पोहचेपर्यंत संध्याकाळ झाली. मोठ्या उत्साहात तेथील टूर ऑर्गनायझरने आमचे स्वागत केले.

लेह हे समुद्र सपाटी पासून११४८० फुटावर आहे आणि त्याची जाणीव व्हायला सुरुवात झाली होती. थोडा श्वास घेण्यास त्रास जाणवत होता पण विवेक सरांच्या दर अर्ध्या तासाच्या पाणी पिण्याच्या REMINDER मुळे शरीर साथ देत होते. सर्वजण खूप दमले असल्याने रात्रीच्या जेवणानंतर लवकरच झोपलो. एक सांगायचं राहिल. रोज रात्री विवेक सर दुसऱ्या दिवशीचा आढावा सांगत . त्यामुळे त्या दिवशीचा प्रवास वेळ , पर्यटन स्थळ याची माहिती मिळत होती.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >




चौथा दिवस २०जुलै २०२५- लेहमधील पर्यटन स्थळ...

उंचीवरील हवामानात, थंडीत रुळण्या साठी म्हणून हा दिवस लेह मधील पर्यटन स्थळ बघण्यासाठी ठेवला. सकाळी उठून 'लेह दर्शन' करण्यासाठी बाहेर पडलो. आणि आमच्या पुढील प्रवासातील आमच्या टेम्पो ट्रॅव्हल चा चालक तुंदोप आणि वाटाड्या नुबु यांची ओळख झाली. पुढील संपूर्ण प्रवासात नुबु ने योग्यरीत्या सर्व माहिती पुरवली.

लेह छोटेखानी गाव आहे. या गावात तिबेटन बुद्धिझमची चांगलीच छाप आहे. बर्फाच्छादित डोंगरांच्या कुशीत वसलेल्या लेहमध्ये बुद्ध विहार, बुद्ध भिक्षुंचे मठ, शाळा यातून तिबेटी संस्कृतीचं, तिबेटी चित्रकलेचं, शिल्प कलेचं आणि रीती रिवाजांचं जागोजागी दर्शन घडतं. बुद्ध देवांच्या लडाखमधील साम्राज्यात हिंडताना बुद्ध भिक्षुंचा मठ , 'शे'चा राजवाडा बघितला.

'ठिकसे'चा 'हेमिस' मठ हा १५व्या शतकात बांधलेला प्रेक्षणीय मठ आहे. या मठात 'मैत्रेय' बुद्धाची पद्मासन घातलेली दोन मजली भव्य मूर्ती आहे. सोनं, जडजवाहीर यांनी मढवलेली ही मूर्ती दैदिप्यमान आहे. तारा देवतेच ही सुरेख देऊळ गोंपा मध्ये आहे. त्याचबरोबर जुनी
भीत्तीचित्रे, तलवारी आणि ईश्वर आयुधं बघण्यासारखी आहेत. त्या मठास भारताचा 'मिनी पोटाला' का म्हणतात, हे इथे आल्याशिवाय कळायचं नाही. लडाखमध्ये अनेक गोंपा किंवा मठ आहेत, पण बहुतेक 'पोटाला' नजरेसमोर ठेवून बांधलेले दिसतात. अंतर्बाह्य हे मठ तिबेटन आहेत. बुद्ध धर्माचे आचार-विचार, कर्मकांड, शिकवणूक पूर्णपणे तिबेटी आहे.

३ इडियट चे शूटिंग झालेली रँचो ची शाळा बघताना या ठिकाणी लडाखी कपडे परिधान करून आम्ही मनसोक्त फोटो काढत रिल्स बनविले.

हॉल ऑफ फेम'ला [प्रसिद्धीच्या दालनात] भेट दिल्याशिवाय लेह यात्रा पुरी झाली नसती. मातृभूमीच्या रक्षणार्थ धारातीर्थी पडलेले जवान, अनेक लढाया तून हिमालयात लढलेल्या रेजिमेंट्स, त्यांनी वापरलेली शस्त्रास्त्रे, इतर युद्धोपयोगी साहित्य, दारूगोळा आदीचं हे भव्य स्मारक आहे. जिवंत प्रदर्शन आहे. तिरंगी झेंड्या बरोबरच रेजिमेंटल फ्लॅग आजही फडकत असतात. 'हॉल ऑफ फेम'मधून हिंडताना छाती अभिमानाने भरून गेली होती. संध्याकाळी याच ठिकाणी लाईट अँड साऊंड चा ४० मिनिटाचा शो बघितला डोळ्यांसमोर 'सियाचीन', 'कारगील'मधील लढाई दिसत होती. जिथे चालणं अवघड आहे तिथे अवजड हत्यार चालवत जीवघेण्या थंडीत २१-२२ हजार फुटांवर आपली सेनादल मातृ भुमीच्या रक्षणार्थ भीम पराक्रम गाजवत होती. पाकिस्तानच्या मुसक्या आवळत होती, पाकिस्तानला चारी मुंड्या चित करत होती. आपले जवान व अधिकारी शहीद होत होते. हे बघता बघता डोळ्याला कधी पाण्याची धार लागली हे कळले देखील नाही. आणि माझं मन भूतकाळातून वर्तमानांत यायला तयार नव्हतं.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >




पाचवा दिवस - २१ जुलै २०२५लेह- नुब्रा..!!!

आदल्या दिवशी विवेक सरांनी सांगितल्याप्रमाणे आमचा प्रवास सर्वात उंच असणाऱ्या खारदूनगला रस्त्याच्या दिशेने चालू झाला. वाटचालीत हिमालयाचं अगदी वेगळं दर्शन घडत होतं. मोठमोठे वाळूचे डोंगर किंवा राखेचे डोंगर सगळीकडे पसरले होते. जणू काही लांबलचक मोठमोठ्या घसरगुंड्या असल्याचा भास होत होता. हिमालय सह्याद्री प्रमाणे काळ्या भिन्न दगडाचा नाही, हे उघड उघड दिसत होतं. हिमालयाचा ठिसूळ पणा प्रकर्षाने जाणवत होता. थंडीत याच घसर गुंड्या बर्फाच्या घसरगुंड्या होत असतील आणि स्कीइंग करणार्यांना याचा मनमुराद आनंद घेता येत असेल. दऱ्या खोऱ्यां मधून पाण्याचे पाट वेगाने वाहत होते. पाण्याच्या आसपासची हिरवाई दिसत होती. आणि कांस पठारावर असलेल्या फुलां सारखी वेगवेगळ्या रंगांच्या  फुलांची चादर पसरली होती. बाकी सगळीकडे उजाड, बोडकं वाळवंट पसरलेलं होतं. जगातील सर्वात उंचीवरील वाळवंट.

निसर्गाचं हे अगदी आगळं-वेगळं रूप पाहात, अगदी वेगळा निसर्ग बघत चाललो होतो.  आणि तो क्षण आला. आम्ही 'खारदूनगला' या जगातील सर्वात उंचावर असणाऱ्या आणि वाहनांच्या वाहतुकीसाठी खुल्या असणाऱ्या १८३८० फुटावरच्या [पाच हजार ६०० मीटर] रस्त्यावरील जत्रेत अभिमानाने उभे होतो. कारण ३ दिवस ज्या उंच ठिकाणी जाण्या साठी शरीराला लावलेल्या पाण्याच्या सवयीचा चांगला परिणाम झाला होता. या ठिकाणी आम्ही काहीही त्रास न होता अर्धा तास घालवला होता.  चांगलीच थंडी जाणवत  होती. परंतु तेथून पाय निघत नव्हता.

या प्रवासातच कारोकोरम डोंगर रांगा आणि लडाख डोंगर रांगाना वेगळ्या करणाऱ्या शयोक नदी व सियाचीन नदीचा संगम बघितला.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >

पुढील प्रवास हा सर्वांत उंच म्हणजे जवळपास १०६ फूट उंच मैत्रेय बुद्ध असणाऱ्या दिक्सिट मठ बघण्यासाठी सुरू झाला. मठाच्या खाली असलेल्या टेकडीच्या माथ्यावर असलेली ही मूर्ती श्योक नदीच्या दिशेने पाकिस्तानकडे तोंड करून आहे आणि ती आपले रक्षण करते असा तेथील लोकांचा समज आहे.

आमच्यातील काका काकू आणि बाकी मैत्रिणींनी वाटेत असणाऱ्या ZIP LINE आणि वाळूतील कार ड्राईव्ह चा ही आनंद घेतला.

आजच्या प्रवासातील शेवटचे ठिकाण म्हणजे SAND DUNES.

लडाखमधील वाळवंटी प्रदेशातील वाळूचे ढिगारे (SAND DUNES) 'हुंदर वाळवंटी प्रदेश' म्हणून ओळखले जातात. हे ढिगारे नुब्रा व्हॅली मध्ये आहेत आणि चांदी सारख्या (SILVER) रंगाच्या वाळू साठी प्रसिद्ध आहेत. येथे पोहचत असतानाच या वाळवंटातील वादळ ही अनुभवले. जोराच्या वाऱ्यासह या वाळवंटातील वाळू उडत होती.

येथे आम्ही दोन कुबडी असणाऱ्या उंटांच्या सफारीचा आनंद घेतला. या उंटांमुळे या भागाला एक खास ओळख मिळाली आहे. अशी आमची आजच्या दिवसाची सफर पूर्ण करून आम्ही नुब्रा येथील टेंट असलेल्या हॉटेल मध्ये वास्तव्य केले. जे एका लडाख रेजिमेंट आर्मी मधून रिटायर झालेल्या सैनिकांचे होते.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >




सहावा दिवस -२२ जुलै २०२५ नुब्रा तुर्तुक नुब्रा...!!!

आज आमचा प्रवास तुर्तुक गावाच्या दिशेने चालू झाला. रस्ता बराच खराब होता त्यामुळे १०० कि.मी. ला ४ तास लागले. तुर्तक येथून पाकिस्तानी सैन्याच्या बंकर आणि भारत आणि पाकिस्तानच्या नियंत्रण रेषेची झलक पाहता येते कारण ते पर्यटकांना परवानगी असलेले शेवटचे मोठे गाव आहे  तुर्तुक हे १९७१ च्या युद्धापर्यंत पाकिस्तानच्या ताब्यात होते आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धा दरम्यान ,हा परिसर तुर्तुकच्या लढाईचे ठिकाण होता. या गावातील बऱ्याच लोकांचे नातेवाईक नियंत्रण रेषेच्या पलीकडे राहतात.

या गावातून निघताना सैन्याच्या दोन जवानांनी लिफ्ट मागितली. ड्राइवर ने बस मध्ये जागा नसल्याने नकार दिला आणि आम्ही सर्व ड्राईव्हर वर तुटून पडलो आणि त्याला बस थांबायला सांगून त्या जवानांना लिफ्ट दिली. कोण आनंद झाला. त्या जवानांनी आमच्याशी वार्तालाप करत चहाची ऑफर दिली. पण वेळ नसल्याने आम्हाला नकार द्यायला लागला. पण शलाका ने त्यांना राख्या बांधत आमच्याकडे असलेले लाडू दिले आणि त्यांनीही मोठ्या प्रेमाने स्वीकारले. हे असे प्रसंग आम्हाला पुढील प्रवासासाठी हुरुप देत होते.

थोडा थोडा पाऊस चालू झाला होता. आम्ही दुपारचे जेवण करून निघालो आणि लगेचच एका पडलेल्या झाडाने किमान एक तास आमची वाट अडवून ठेवली पण लडाख च्या निसर्ग सोंदर्याने वेळ कसा गेला कळले देखील नाही. पुढे सियाचीन वॉर म्युझियम बघून  आमचा प्रवास परत नुब्रा च्या दिशेने चालू झाला.

रात्री भरपूर पाऊस चालू झाला. आणि पंगॉग ला जाता येईल की नाही याची चिंता लागली कारण या भागात कधीही लँड SLIDE होऊन रस्ते दोन दोन दिवस बंद होण्याचा धोका असतो. पण नशिबाने रस्ता चालू असल्याचे UPDATE मिळाले. आणि निश्चित झालो.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >



सातवा दिवस - २४ जुलै २०२५ नुब्रा ते पँगॉन्ग लेक. . . . !!!

आजचा प्रवास साधारण ९तासांचा होता. साधारण ८ ते १०कि.मी.चा रस्ता सैल मातीचा आणि चिखलाचा होता. त्यात एक छोटी गाडी ही फसलेली दिसली त्यामुळे गाडी काळजीपूर्वक चालवावी लागत होती.

या प्रवासात २ मोठे पास लागतात

एक वरी ला [१८४२९ फूट] आणि चांग ला पास [१७६८८ फूट].

झिंग्राल गावातून चांग ला येथे एक उंच डांबरी रस्ता येतो. रस्त्यावरून लहान ओढे वाहताना दिसत होते, ज्यामुळे दुचाकी स्वारांसाठी हा प्रवास आव्हानात्मक होता. वरी ला पास पर्यंतचा प्रवास सुखकर झाला पण पुढील प्रवास तीव्र वळणांचा असल्याने डोकं दुखायला लागले होते थोडा दम ही लागत होता. आमच्यातील प्रीती काकूंना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला म्हणून चांग ला न थांबता पुढील प्रवास सुरू केला आणि संध्याकाळी ६ च्या सुमारास पँगॉन्ग लेक ला पोहचलो.

पँगॉन्ग लेक [PANGONG LAKE] हा एक प्रसिद्ध सरोवर आहे, जो भारत आणि चीनच्या सीमेवर पसरलेला आहे.

या सरोवराचे विहंगम दृश्य हवामान स्वच्छ असल्यास अप्रतिम दिसते. पँगाँग त्सो [तलाव] समुद्रसपाटीपासून १४,२७० फूट उंचीवर वसलेले आहे आणि जगातील सर्वात उंच खाऱ्या पाण्याच्या सरोवरां पैकी एक असल्याचे म्हटले जाते. हे सरोवर जवळजवळ ५ किमी रुंद आणि १३४ किमी लांब आहे, त्याचा एक तृतीयांश भाग भारतात आणि उर्वरित दोन तृतीयांश चीनमध्ये आहे. हे सरोवर केसाळ दुधाळ ढगांनी सजवलेले आहे आणि पाण्यात कलात्मक छाप पाडणारे कडेकोट पर्वत आहेत. उन्हाळ्याच्या काळात हे सरोवर विविध प्रकारच्या पक्ष्यांसाठी प्रजनन स्थळ आहे. येथे बार-हेडेड हंस, ब्राह्मणी बदके, काळ्या मानेचे क्रेन आणि सीगल सामान्यतः आढळतात. या सरोवरा बद्दल सर्वात आकर्षक गोष्ट म्हणजे ते वेगवेगळ्या वेळी निळे, राखाडी-हिरवे आणि लाल रंग बदलते. हिवाळ्यात, खारे पाणी असूनही तलाव पूर्णपणे गोठतो.

पण तेथे पोहचताच आमचा हिरमोड झाला कारण वातावरण पावसाळी झाले होते. वादळ आणि पावसाने आम्हाला गाठले. लगेचच हॉटेलवर परतलो. पँगॉन्ग ची थंडी जाणवायला लागली होती रात्री तापमान उणे १ पर्यंत गेले होते. हिटर बेड मूळे थंडी सुसह्य वाटत होती.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >



आठवा दिवस - २४ जुलै २०२५ लेह कडे प्रस्थान...!!!

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून परत एकदा तलाव बघायला गेलो. सूर्य महाराज डोक्यावर आले होते आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे वेगवेगळ्या रंगांची झलक या तलावाचे पाणी दाखवत होते तेव्हा स्वर्ग काय असतो याची जाणिव होत होती. तो निसर्गाचा ठेवा डोळ्यात साठवत परतीचा प्रवास सुरु झाला. या सरोवरा जवळच सैन्याच्या एका कॅम्प परिसरात अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला होता. आम्ही सर्वांनी तेथे नतमस्तक होऊन पुढील प्रवासास सुरवात केली.

पँगॉन्ग ते लेह या प्रवासात परत एकदा चांग ला पास लागतो आणि पुढे रस्ता वेगळा होतो त्यामुळे आजचा प्रवास साधारण ४ तासांचा होता. परत एकदा चांग ला ला जाण्याची संधी मिळाली आणि बस चे टायर पंक्चर झाल्यामुळे थोडा जास्त वेळ येथे घालवता आला. सुदैवाने कोणालाही त्रास झाला नाही.

दुपारी एक ला लेह ला पोहचलो. जेवून आराम केला. आता फक्त एक गोष्ट बाकी होती ती म्हणजे आमच्या बायकांचा जिव्हाळ्याचा विषय, "शॉपिंग"....!!!

आजची संध्याकाळ फक्त खरेदी खरेदी आणि खरेदी.

लेहचा बाजार, दुकानं ही बुद्धीस्ट चित्रे, तिबेटन कला-कुसर, मूर्ती, दागिने, यांनी ठासून भरलेली होती. खास करून 'पिरोझा' किंवा 'टरक्वाईस' स्टोन चा सर्वच गोष्टीत मोठ्या प्रमाणावर वापर केलेला दिसत होता. दागदागिन्यां बरोबरच दागिने ठेवायच्याही अत्यंत आकर्षक पेट्यां वरून नजर ठरत न्हवती. विविध प्रकारची प्रार्थना चक्र, चित्र, लाकडी ड्रॅगन्स, लडाखी कारपेटस्, रग्ज, स्टोल्स आदी गोष्टी नक्कीच आकर्षक वाटत होती. लेहची हमखास खरेदी म्हणजे पश्मिना शाल. पण आधीच एक असल्याने तो मोह मला आवरता घ्यायला लागला व लडाखी साड्या व ड्रेस सुट ची खरेदी करत या बाजारात असलेल्या एकमेव मराठी माणसाच्या "खानावळ"नामक रेस्टॉरंट मध्ये पिठलं फुलक्या वर ताव मारला. शॉपिंग आणि जेवणाचा आनंद घेत संध्याकाळचा वेळ कसा गेला कळलंच नाही.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >



नववा दिवस २५ जुलै २०२५ मुंबई कडे प्रस्थान...!!!

आज एक अनामिक हुरहूर जाणवत होती. मुंबईचे वेध लागले होते . आम्ही सर्व मैत्रिणींनी केलेली मजा, गप्पागोष्टी, एकत्र घालवलेले आनंदाचे क्षण, एकमेकींची केलेली मदत, आपुलकी, जिव्हाळा या सर्व गोष्टी आठवून डोळे भरून येत होते आणि या सर्व अविस्मरणीय आठवणी आयुष्यभरासाठी मनात जतन करत आमच्या विमानाने मुंबईकडे उड्डाण केले.

या पूर्ण प्रवासात सांगायच्या राहिलेल्या काही गोष्टी म्हणजे

सूर्योदय व सूर्यास्त- या परिसरात सूर्योदय हा सकाळी ५.३० ला व सूर्यास्त संध्याकाळी ७.३० ला होत असे त्यामुळे खूप मोठा काळ आपल्याला अनुभवता येतो.

जर्दाळू आणि सफरचंद- लेह साठी प्रवास सुरु केल्यापासून ते संपेपर्यंत जेथे जेथे जरदाळूचे अथवा सफरचंदाचे झाड दिसे तेथे तेथे आमची मैत्रीण शलाका व विनया आमच्या साठी फळ तोडून आणत असत. आम्ही किती जर्दाळू खाल्ले असतील त्याची गणतीच नाही.

# अविस्मरणीय लेह- लडाखची सफर >

सलामी- प्रत्येक पास ला आम्ही आपल्या भारतमातेचे स्मरण करून आपल्या सैनिकांसाठी सलामी देत होतो.

दुर्गमल्हार ट्रेक अँड टूर्स- हा संपूर्ण प्रवास ज्यांच्यामुळे सफल आणि यशस्वी झाला त्या टूर कंपनीचे सर्वेसर्वा विवेक पाटील सर. भरपूर प्रवास केलेले, भरपूर अनुभव आणि माहितीचा खजिना असलेले मार्गदर्शक.

पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवसापर्यंत सर्वांची एखाद्या कुटूंबा सारखी काळजी, योग्य वेळी सूचना, सल्ले, महत्त्वपूर्ण माहिती, वेळप्रसंगी फोटोग्राफी, योग्य निर्णय या सर्व गोष्टींची पूर्तता तन्मयतेने केली.

त्याकरिता सरांचे व त्यांच्या टीम चे मनपुर्वक धन्यवाद.

तसेच त्यांनी नेमलेल्या आमच्या टूर चा गाईड नुबु याला विसरणे अशक्य.

पूर्ण प्रवासात एखाद्या पाठीराख्या भावाप्रमाणे व आम्हा मैत्रिणींचे नखरे सहन करून आम्ही केलेल्या प्रत्येक मागणीची तत्परतेंने पूर्तता केली. त्यासाठी त्याचे खूप खूप धन्यवाद.

आणि आता माझ्या मैत्रिणी खासकरून प्रियांका आणि शलाका यांनी मनापासून या ट्रिप चे आयोजन केले. त्यासाठी त्यांनाही मनापासून THANK YOU.

अश्या प्रकारे नाही नाही म्हणता एका अविस्मरणीय प्रवासाची मी साक्षीदार ठरले याचा अत्यानंद झाला

लेखन : वीणा कपिल पढेर २७ जुलै २०२५
रोटरी क्लब बदलापूर इंडस्ट्रियल एरिया.






Heartfelt thanks to our Rotary family for your valuable inputs, inspiring articles, and creative contributions that made our 2nd bulletin of the year truly memorable.